# मा.कृषि विकास अधिकारी

# यांचे कार्यालय


# जिल्हा परिषद, यवतमाळ

(३०/०४/२०२५)

# नागरिकांची सनद

Website :- https://zpyavatmal.gov.in

Email :- adoyavatmal@gmail.com




मंजुर आकृतीबंध :- एकूण ८२ अधिकारी / कर्मचारी

कार्यालयीन कामाची वेळ :- सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५

# नागरिकांची सनद

**प्रस्तावना** :-

भारत हा कृषि प्रधान देश असून देशाच्या स्थूल राष्ट्रीय उत्पन्नात सन २०२४-२५ मध्ये शेती क्षेत्राचा वाटा 17.66% आहे. कृषि उत्पन्नामध्ये वाढ होणे आवश्यक असून त्यासाठी शेतीविषयक आधुनिक तंत्रज्ञान, सुधारित बियाणे, खते, औजारे, पीक संरक्षण औषधे इ. बाबी शेतक-यांना माफक दरात योग्यवेळी उपलब्ध होणे व त्यासाठी शेतक-यांमध्ये जाणीव, जागरुकता निर्माण करणे हे उद्दिष्ट ठेऊन कृषि विभाग, जिल्हा परिषद, यवतमाळ कार्यरत आहे. यवतमाळ जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्र 13,51,926 हेक्टर असून निव्वळ पिकाखाली सर्वसाधारण क्षेत्र ९,60,500 हेक्टर आहे. खरीप पिकांचे सर्वसाधारण क्षेत्र ९,02,072 हेक्टर असून रब्बी 1,32,316 हेक्टर, उन्हाळी पिकाचे क्षेत्र 16,460 हेक्टर आहे. जिल्ह्यात एकूण १६ पंचायत समित्या असून मुख्य पिके कापूस, ज्वार, तूर , सोयाबीन आहेत. जिल्ह्याचे सरासरी वार्षिक पर्जन्यमान ९26.80 मी.मी. असून 1 जून ते 30 सप्टेंबर पर्यंतचे सरासरी पर्जन्यमान ९26.70 मी.मी. आहे.

कृषि विभाग हा जिल्हा परिषदेचा एक महत्वपूर्ण विभाग असून कृषि विकास अधिकारी हे सद्स्य सचिव म्हणुन या विभागाचे काम पाहतात. शेतक-याचा सर्वांगीण विकास करून त्यांचा सामाजीक व आर्थिक स्तर उंचविण्याचे दृष्टिने वैयक्तीक लाभाच्या व लोकोपयोगी योजना सातत्याने राबविल्या जातात. या योजना ग्रामीण भागातील तळागाळातील लोकांपर्यंत पोहचविण्याचे कार्य या विभागामार्फत केल्या जाते. अनुसुचित जाती / नव बौद्ध घट्कातील शेतक-याना अर्थसहाय्य देण्याची योजना डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना, बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना, आदिवासी उपाय योजना (टी.एस.पी.) व ( ओ. टी. एस. पी.) योजना या विभागामार्फत राबविण्यात येतात. तसेच राष्ट्रीय बायोगॅस (New National Biogas and organic Manure Program (NNBOMP) )कार्यक्रम, जिल्हा परिषद अंतर्गत सेस फंड योजना दरवर्षी / सातत्याने राबविण्यात येतात. बि-बियाणे, रासायनिक खते व किटकनाशके या बाबतीत पुरवठा व गुणनियंत्रण कामांची जबाबदारी कृषि विभाग, जिल्हा परिषद, यवतमाळ मार्फत पार पाडण्यात येते.

२. कृषि विभाग जि.प.यवतमाळ कार्यालयाची रचना :-

मा: कृषी विकास अधिकारी कृषी विभाग जिल्हा परिषद यवतमाळ यांना सहाय्य करण्याकरिता त्यांच्या अधिपत्याखाली प्रशासन शाखा, लेखा शाखा व तांत्रिक शाखा कार्यरत आहेत. या सर्व शाखांमार्फत त्यांच्याशी संबंधित नस्ती मा. कृषी विकास अधिकारी यांच्याकडे सादर केल्या जातात. या शाखांकडे करण्यात आलेल्या कार्यालयीन कामाच्या विषयाची विभागणी परिशिष्ट एक मध्ये दर्शविली आहे.

३. गाऱ्हाणी व तक्रारी यांचे निराकरणः

नागरिकांची काही गाऱ्हाणी असल्यास यासंबंधी त्यांना परिशिष्ट-१ मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदविता येईल. गाऱ्हाणी समक्ष भेटीत / पत्राने तथा ई-मेलद्वारे मांडता येतील.

४. नागरिकांच्या सनदेचा आढावा दरवर्षी घेण्यात येईल व त्यात आवश्यकतेनुसार बदल करण्यात येतील.

५. उद्दीष्टे :

जनतेला विहीत कालावधीत सेवा पुरविण्याच्या उद्देशाने नागरीकांची सनद हा उपक्रम राबविण्यात येत असून त्याअनुषंगाने कार्यवाही करीत असताना नागरिकांना सौजन्यपूर्ण वागणूक देण्याची जबाबदारी मा. कृषि विकास अधिकारी जि.प.यवतमाळ अधिपत्याखालील प्रत्येक अधिकारी/ कर्मचारी यांची राहील.

# कृषी विभाग जिल्हा परिषद, यवतमाळ

## नागरिकांची सनद

(शासन परिपत्रक साप्रवि/सनद/२०११/१८/अ दिनांक ६ सप्टेंबर २०११)

| अ.क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरविणारे अधिकारी यांचे नाव हुद्दा | सेवा पुरविण्याची कालमर्यादा | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरीष्ठ अधिकारी यांचे नाव व हुद्दा |
|---|---|---|---|---|
| 1 | जिल्हा स्तरावरील तथा विभागीय स्तरावरील लोकशाही दिनाची तक्रारी निकाली काढणे | कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद, यवतमाळ | 30 दिवस | मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, यवतमाळ - 07232-244545 |
| 2 | माहिती अधिकार अधिनियम 2005 | जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा कृषि अधिकारी (सामान्य) अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ | 30 दिवस | कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद, यवतमाळ |
| 3 | प्रथम अपिल | कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद, यवतमाळ | ४५ दिवस | वरीलप्रमाणे |
| 4 | राष्ट्रीय बायोगॅस विकास कार्यक्रमा अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना अनुदान देणे | कृषि विकास अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ | एप्रिल ते मार्च | वरीलप्रमाणे |
| 5 | डॉ. बाबासाहेब कृषी स्वावलंबन योजना अनुसूचित जाती | कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद, यवतमाळ | एप्रिल ते मार्च (मुदत २ वर्ष) | वरीलप्रमाणे |
| 6 | बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना अनुसूचित जमाती (क्षेत्राअंतर्गत व क्षेत्राबाहेरील) | कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद, यवतमाळ | एप्रिल ते मार्च (मुदत २ वर्ष) | वरीलप्रमाणे |
| 7 | राष्ट्रीय कृषि विकास योजना अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती | कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद, यवतमाळ | एप्रिल ते मार्च | वरीलप्रमाणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 8 | कृषि निविष्ठा व गुणनियंत्रण | कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद, यवतमाळ | एप्रिल ते मार्च | वरीलप्रमाणे |
| 9 | लोक आयुक्त व उपलोक आयुक्त प्रकरणे निकाली काढणे | कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद, यवतमाळ | एप्रिल ते मार्च | वरीलप्रमाणे |
| 10 | मा.आमदार / खासदार / मंत्री महोदयांकडील प्राप्त प्रकरणे | कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद, यवतमाळ | एप्रिल ते मार्च | वरीलप्रमाणे |
| 11 | जि.प. सेस फंडातुन शेतकऱ्यांना अनुदान तत्वावर योजनांची अंमलबजावणी करणे | कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद, यवतमाळ | एप्रिल ते मार्च | वरीलप्रमाणे |